

देगलूर : देगलूर महाविद्यालयात अल्पसंख्याक दिन साजरा करण्यात आला.

# देगलूर महाविद्यालयात अल्पसंख्याक दिन

देगलूर : अड्त व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्राच्यावतीने अल्पसंख्याक हक्क दिनानिमीत्त अभ्यासपुरक व्याख्यान संपन्न झाले. या वेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य ए.बी. चिद्रावार होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून देगलूर तालुका न्यायालयातील विधीज्ञ एम. एम. ईनामदार उपस्थित होते. या वेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी ज्ञानाच्या माध्यमातून स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण केला पाहीजे. त्याशिवाय समाजाच्या विकासाला दिशा मिळणार नाही असे प्रतिपादन केले. प्रारंभी डॉ. बी. आर कतुरवार यांनी आपल्या प्रास्ताविकपर विचारातून कार्यक्रमाच्या आयोजनाचे महत्व सांगीतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहीस्था बागवान तर आभार जळकोटकर या विद्यार्थीनीने मानले. या वेळी प्रा. रत्नाकर लक्षटे, प्रा. व्यंकट खंदकुरे, प्रा. कोकने यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.